सकाळ



निपाणी : येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमप्रसंगी मुख्याध्यापक विनायक बाचणे, एस. बी. पवार, पल्लवी पाटील व इतर.

# नूतन मराठी विद्यालयात जनजागृती

निपाणी : येथील छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित नूतन मराठी विद्यालय व पुणे येथील क्विक हिल फाउंडेशनच्यावतीने सायबर सुरक्षेबाबत जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. देवचंद महाविद्यालयाचे वॉरियर्स पल्लवी पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी डिजिटल युगात इंटरनेट, मोबाईल आणि ऑनलाइन व्यवहारांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला असून सायबर फसवणुकीचे प्रकारही वाढत असून त्यापासून सावधान राहण्याचे आवाहन केले. अध्यक्षस्थानी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक विनायक बाचणे होते. शिक्षक एस. बी. पवार यांनी प्रास्ताविक केले.

Belgaum, Main
28/08/2026 Page No.10